# केस स्टडी

## संवेदनशील पत्रकारीतेबाबत एका स्थानिक वृत्तपत्रात छापून आलेल्या बातमीचा उदाहरणासाठी उपयोग

### गर्भपाताच्या औषधाच्या नावाखाली विकला जात आहे मृत्यू

**चुकीचा मथळा**

शहरः एका स्त्रीने गर्भपात घडवून आणणाऱ्या औषधांचे सेवन केल्यामुळे तिच्यावर मृत्यू ओढवला. असे असतानाही या शहरातील औषधविक्रेते ही औषधे उघडपणे विकत आहेत. अलीकडे दोन स्त्रियांना ही औषधे घेतल्यामुळे रूग्णालयात दाखल करण्याची वेळ आली होती. या घटनांपाठोपाठ मुख्य वैद्यकीय आणि आरोग्य अधिकारी (सीएमएचओ) यांनी औषध निरीक्षकांना पत्र लिहिले आणि या औषधांवर जास्त नियंत्रण आणण्याची विनंती केली. गतवर्षी एका चार महिन्यांच्या गर्भवती स्त्रीचा एका रूग्णालयात तिने औषध विक्रेत्यांकडून आपला गर्भपात करण्यासाठी घेतलेल्या औषधामुळे मृत्यू झाला होता. तिला खूप रक्तस्राव होत असल्यामुळे रूग्णालयात आणण्यात आले होते. प्रशिक्षित नसतानाही तिचा गर्भपात करण्याचा प्रयत्न केला गेला. दुर्दैवाने तिचा जीव वाचू शकला नाही. ही केस महिला कल्याण विभाग आणि पोलिसांकडे नोंदवली गेली. अलीकडेच वैद्यकीय तज्ज्ञांच्या झालेल्या बैठकीत हा प्रश्न एका प्रतिष्ठित डॉक्टरने उचलला होता. त्यांनी सांगितले की दररोज १-२ तरूण स्त्रियांच्या अशा घटना येतात जिथे स्त्रिया गर्भपात करण्यासाठी औषधे घेतात आणि रूग्णालयात गुंतागुंतीसाठी दाखल होतात. त्या म्हणाल्या की, स्त्रियांना या औषधांच्या घातक परिणामांची कल्पना नाही. यातील अनेक तरूण स्त्रिया २०-२२ वर्षांच्या आहेत.

**मेडिकल मेथड ऑफ अॅबॉर्शन असुरक्षित असल्याचे या बातमीच्या मथळ्यात स्पष्ट करण्यात आले आहे. या पद्धतीच्या परिणामकारकतेला प्रस्थापित करण्यासाठी जागतिक पुरावे आहेत.**

त्याचवेळी सीएमएचओने मेडिकल मेथड ऑफ अॅबॉर्शन (एमएमए)च्या गोळयांच्या मोफत आणि भरपूर विक्रीचा गंभीर विषय म्हणून दखल घेतली आहे. त्यांनी एक सूचना जारी केली आहे की एमएमएची औषधे प्रसूतीतज्ज्ञांच्या चिठ्ठीविना विकली जाऊ नयेत. एखादा औषधविक्रेता एमएमए औषधे योग्य चिठ्ठीशिवाय विकताना आढळल्यास त्याच्यावर एमटीपी कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल. ते म्हणाले की शहरातील अनेक औषधविक्रेत्यांबाबत ते एमएमए औषधे योग्य चिठ्ठीविना विकत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे सर्व औषध निरीक्षकांना मिफेप्रिस्टोन आणि मिसोप्रिस्टोल (एमएमए औषधे) विकण्यास बंदी घालण्यात आली आहे.

**एमएमए औषधे केवळ एका प्रिस्क्रिप्शनवर उपलब्ध व्हायला हवीत ही माहिती तांत्रिकदृष्टया बरोबर आहे. तथापि ही बातमी ज्या दृष्टीकोनातून दिसून येते त्यातून या औषधांच्या परिणामकारकतेबाबत आणि कायदेशीरपणाबाबत गैरसमज निर्माण होऊ शकतात.**

एनआरएचएमच्या अधिकाऱ्याने सांगितले की, राज्यातील सर्व गर्भपातांमधील ६० टक्के गर्भपात असुरक्षित आहेत. भारतात ७ टक्के मातामृत्यू हे असुरक्षित गर्भपातामुळे होतात.

एका खासगी डॉक्टरचे मतः डॉक्टरच्या सल्ल्याविना एमएमए औषधांचे सेवन करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. अतिरिक्त रक्तस्त्रावामुळे स्त्रीचा मृत्यू ओढवू शकतो. एमएमए औषधे घेण्यापूर्वी एक संपूर्ण चाचणी करण्यासाठी तरतुदी उपलब्ध आहेत. एमएमए औषधे घेतल्यावर डॉक्टरच्या देखरेखीखाली स्त्रीला ठेवणे अत्यावश्यक असते.

**डॉक्टरचे मत तांत्रिकदृष्टया अचूक आहे. परंतु एका नकारात्मक बातमीबाबत तो दिल्यामुळे गर्भपाताच्या वैद्यकीय पद्धतींच्या कार्यक्षमता आणि सुरक्षितता यांच्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते.**